दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS LAT SWITCHGEAR INDOASIAN
Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

लातूर वर्ष ३ रे अंक २७५ वा मंगळवार दि.०९ एप्रिल २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# लोकसभा निवडणुकीत मोठे मताधिक्य देण्याचा लातूर ग्रामीण भाजपा कार्यकर्ता बैठकीत निर्धार

## आ. रमेशअप्पा कराड यांच्याकडून अर्चना पाटील चाकूरकर यांचे अभिनंदन

लातूर : – देशाचे यशस्वी पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी साहेब यांना समर्थन देण्यासाठी लातूर लोकसभा निवडणुकीत भाजपा महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांना मोठे मताधिक्य देण्याचा निर्धार भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वात लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपाच्या बैठकीत करण्यात आला. या बैठकीत अर्चना पाटील चाकूरकर यांनी देशहित आणि जनहित लक्षात घेऊन भारतीय जनता पार्टी प्रवेश घेतल्याबद्दल भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून त्यांचे अभिनंदन केले.





लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील भाजपाच्या प्रमुख पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधीची बैठक भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात सोमवारी दुपारी झाली. या बैठकीस बूथ प्रमुख अभियानाचे नरेंद्र काळे, अर्चना पाटील चाकूरकर, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव भागवत सोट, ज्येष्ठ नेते प्रदीप पाटील खंडापूरकर, युवा मोर्चाचे प्रदेश सचिव ऋषिकेशदादा कराड, जिल्हा पंचायत राज व ग्रामविकास सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, लातूर ग्रामीण भाजपाचे अध्यक्ष अनिल भिसे, रेणापूर तालुकाध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, महेंद्र गोडभरले, अभिषेक अकनगिरे आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.

लोकसभेची निवडणूक ही राष्ट्रीय प्रश्नासाठी अत्यंत महत्त्वाची आहे स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच गेल्या दहा वर्षात नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र शासनाने अनेक ऐतिहासिक आणि धाडसी निर्णय घेतले विकास कामात देशाला उंचीवर घेऊन गेले असल्याचे सांगून आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की देशातील गोरगरीब सर्वसामान्य माणसांना दिलासा देणाऱ्या अनेक योजना सुरू केल्या या सर्व योजनांचा गरजू आणि गरिब लाभार्थ्यांना थेट लाभ मिळाला. जगाचे नेतृत्व करण्याची क्षमता असलेल्या यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांना भक्कम समर्थन मिळवून देणे ही तुमची आमची जबाबदारी आहे.

केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्या माध्यमातून गावागावात मोठ्या प्रमाणात विविध विकास कामांना निधी मिळवून दिला असून केलेल्या विकास कामाच्या जोरावर लातूर लोकसभा निवडणुकीत भाजपा महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांना लातूर ग्रामीण मतदार संघातून मोठे मताधिक्य मिळावे याकरिता प्रत्येक कार्यकर्त्यांनी जिद्दीने जोमाने कामाला लागावे प्रत्येक बुथवर भाजपाच्या मतदानाची टक्केवारी कशा पद्धतीने वाढेल यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन आ. रमेशअप्पा कराड यांनी केले त्याचबरोबर आपसातील मतभेद बाजूला सारून निवडणूक प्रचार यंत्रणा प्रभावीपणे राबवून शासनाच्या लाभार्थ्यांबरोबरच सर्व प्रकारच्या मतदारापर्यंत पोहोचावे याबाबतच्या अनेक महत्त्वपूर्ण सूचना केल्या.

या बैठकीत बोलताना नरेंद्र काळे यांनी बूथ कामाचा आढावा घेऊन प्रत्येक बुथवर ५१ % भाजपला मतदान झालेच पाहिजे अशी सूचना केली व लोकसभा निवडणुकीत लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातून भाजपा उमेदवाराला सर्वाधिक मताधिक्य राहील अशी अपेक्षा व्यक्त केली तर अर्चना पाटील चाकूरकर यांनी निवडणूक काळात काय बोलावे काय बोलू नये याबाबत कार्यकर्त्यांनी कटाक्ष पाळावे अशी सूचना करून देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी तिसऱ्यांदा झाले पाहिजेत हेच ध्येय आणि हा एकच उद्देश आपल्या सर्वांचा असल्याने आ. रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वातील लातूर ग्रामीण मधील भाजपाचे लढवय्या कार्यकर्ते जिद्दीने जोमाने काम करून मताधिक्य मिळवतील यात शंका नाही असे बोलून दाखवले.

प्रारंभी रेणापूर तालुकाध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे यांनी बैठकीचे प्रास्ताविक केले या बैठकीस लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपाचे प्रमुख पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, सुपर वॉरियर्स, शक्ती केंद्रप्रमुख यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

## माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी नागरिकांच्या घेतल्या भेटी

लातुर / प्रतिनिधी : – राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी सोमवार दि. ८ एप्रिल रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था पदाधिकाऱ्यासह नागरिकांच्या भेटी घेऊन त्यांच्या निवेदनाचा व निमंत्रणाचा स्वीकार करून संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या. याप्रसंगी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीशैल उटगे, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हा. चेअरमन समद पटेल, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संतोष देशमुख, एकनाथ पाटील, सचिन बंडापल्ले, पुनित पाटील, गणेश एसआर देशमुख, बालाजी साळुंखे, रत्नाकर औसेकर, पत्रकार शहाजी



पवार, विकास कांबळे, पिंटू खैरमुडे, संभाजी रेड्डी, खंडू सुरवसे, चंद्रकांत धायगुडे, विष्णुदास धायगुडे, विजयकुमार धायगुडे, केशव धायगुडे, नामदेव धायगुडे, आनंद वैरागे आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

## तुम्ही एक भुजबळ पाडाल आम्ही १६० उमेदवार पाडू! ओबीसी नेत्याचा जरांगे पाटलांना इशारा

नाशिक : – नाशिक लोकसभा मतदारसंघातून छगन भुजबळ यांना पाडण्याची भाषा मनोज जरांगे-पाटील करत आहेत. परंतु संपूर्ण ओबीसी समाज छगन भुजबळ यांच्या पाठीमागे उभा आहे. तुम्ही एक भुजबळ पाडाल, तर आम्ही मराठा समाजाचे १६० उमेदवार पाडू, असा खणखणीत इशारा ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी दिला आहे.नाशिकच्या जागेवरून महायुतीत घमासान सुरू आहे. या मतदारसंघातून राष्ट्रवादी अजित पवार गटाचे मंत्री छगन भुजबळ यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. तर दुसरीकडे मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी भुजबळ निवडणुकीत उभे राहू द्या, मग सांगतो, असा इशारा दिला आहे. यावरून ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी मनोज जरांगे-पाटलांवर निशाणा साधला आहे. शेंडगे म्हणाले की, आम्ही सर्व जण छगन भुजबळ यांच्या पाठीमागे उभे राहू. त्यांना पाडण्याची भाषा मनोज जरांगेंकडून होत आहे. मात्र, तुम्ही एक भुजबळ पाडाल तर आम्ही १६० उमेदवार पाडू, असा इशारा त्यांनी यावेळी दिला आहे. नाशिकमध्ये आम्ही सर्व जण प्रचारात उतरू. संख्येच्या गणिताने बघितले तर छगन भुजबळ यांना पाडणे अशक्य आहे, असेही त्यांनी म्हटले आहे. ते पुढे म्हणाले की, आता हे जरांगेंनी सर्व थांबवले पाहिजे.

## राज ठाकरे काय घोषणा करणार? मनसे-भाजपा युती होणार? संदीप देशपांडेंनी सांगितली इनसाइड स्टोरी

राज्यात लोकसभा निवडणुकीची धामधूम सुरु आहे. अशातच आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा (मनसे) गुढीपाडवा मेळावा उद्या ९ एप्रिलला शिवाजी पार्क येथे होणार आहे. मनसेकडून गुढीपाडवा मेळाव्याची जोरदार तयारी सुरू आहे.



दरम्यान, मनसेनेचे अध्यक्ष राज ठाकरे (ठरक्ष ढ्हरलज्ञशीरू) या मेळाव्यात काय बोलणार याची चर्चा जोरदार सुरू आहे. याबाबत मनसे नेते संदीप देशपांडे यांनी इनसाइड स्टोरी सांगितली.

राज ठाकरे यांनी काही दिवसापूर्वी केंद्रीय मंत्री अमित शाह यांची भेट घेतली होती. यामुळे आता ठाकरे काही राजकीय भमिका जाहीर करणार का? अशा चर्चा सुरू आहेत. गुढीपाडवा मेळाव्याला दरवर्षी राज ठाकरे संबोधित करतात. पक्षाला पुढच एक वर्षी काय करायचं आहे, या मार्गदर्शन उद्या होईल. आम्हाला याची उत्सुकता आहे, असंही संदीप देशपांडे म्हणाले. राज ठाकरे यांच्या भाषणात सरप्राईज असतं, ते उद्याच समजेल. राजसाहेब जे राजकारण करतात ते सर्वसामान्यांच्या हिताच करतात, असंही देशपांडे म्हणाले.

भाजप नेत्यांच्या भेटीत काय घडलं याची माहिती उद्या राज ठाकरेच देतील. काही लोकांकडे वास्तुंचा वारसा असतो आमच्याकडे विचारांचा वारसा आहे, उद्या शिवतीर्थावर सगळ्यांच्या प्रश्नांची उत्तरं मिळणार आहेत, असंही संदीप देशपांडे म्हणाले.

# लातूर लोकसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार सुधाकरराव शृंगारे यांचा लोहा - कंधार विधानसभा मतदारसंघ परिसरात झंझावात.







लातूर लोकसभा मतदारसंघ अंतर्गत लोहा - कंधार विधानसभेतील माळाकोळी शहरात बारा ज्योतिर्लिंग देवस्थान, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास वंदन, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास सादर नमन, लोहा शहरात कार्यकर्ता सदिच्छा भेट दौऱ्याअंतर्गत नगरसेवक श्री. भास्कर पाटील, माजी नगरसेवक श्री. छत्रपती धुतमल, माळाकोळी शहरात कार्यकर्ता सदिच्छा भेट दौऱ्याअंतर्गत श्री. संतोष तिडके, श्री. केरबा सावकार बिडवई, किवळा येथे माजी सभापती श्री. शंकरजी ढगे, संत बाळगीर महाराज मंदिर, इच्छापूर्ती गणेश मंदिर,कौठा येथील बाबुराव देशमुख, उस्माननगर येथील श्री. बाबुराव घोरमल पाटील कापसी येथील श्री. हौसाजी रामजी कांबळे (कापसीकर), तसेच नागरिकांची चालती - फिरती भेट घेऊन संवाद साधला तदनंतर विविध मंदिरात मनोभावे पूजन करून उपस्थित भाविक-भक्तांशी मुक्त संवाद साधला. याप्रसंगी भारतीय जनता पार्टी प्रदेश प्रवक्ते श्री. गणेशदादा हाके, महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष प्रणिताताई देवरे, माजी सभापती श्री. अशोकराव केंद्रे, भाजपा सरचिटणीस श्री. भारत चामे, ॲड. संभाजी पाटील, नांदेड जिल्हा भाजप उपाध्यक्ष श्री. भगवानराव राठोड, राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) नेते डॉ. उत्तमराव सोनकांबळे, लोहा तालुका भाजपा अध्यक्ष श्री. आनंदराव पाटील, कंधार तालुका भाजपा अध्यक्ष श्री. किशन धापाडे, श्री. मधू पाटील डांगे, श्री. मामा गायकवाड, चेअरमन शिवनखेड श्री. राजकुमार मोटे पाटील, सरपंच कवठाळी श्री. मनोहरराव बुड्डे पाटील, सरपंच श्री. शेषराव पाटील, श्री. तुकाराम वारकड गुरुजी, श्री. साईनाथ कपाळे, श्री.बालाजी बनाळे, श्री. हनुमंत शिंदे, श्री. शिवाजी चक्रधर, श्री. विजय मंदावाड, श्री. विनोद पांचाळ, श्री. शहाजी आवटे, भीमराव जमदाडे ,वडगाव सरपंच बंडू पाटील काळे, टेळ्की सरपंच संदीप देशमुख, लोंढे सांगवी सरपंच रंगराव लोढे, बोरगाव सरपंच धनाजी आढव, साईनाथ पाटील, बालाजी तिडके, काशिनाथ नामदाडे, वडगाव चेरमन बालाजी पाटील, रावसाहेब देशमुख, माजी जि.प. सदस्य चंद्रमणी मस्के, कांता बिडवे, माजी नगसेवक भास्कर पाटील, पिराजी पवार, अजय हंकारे, माजी नगरसेवक दत्ता वाले, किरण सावकार, शहाजी चाटे, सुरज साठे, गोविंद मुरकुटे, जनार्धन तिडके, श्री. राजकुमार केकाटे आदी मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

## संपादकीय....

### ग्रीन जीडीपी – नववसाहतवादाचे साधन?

निसर्ग ओरबाडून प्रगती साधायची, त्यानंतर त्याविषयी कळवळा दाखवायचा. पण त्याच्या संवर्धनासाठी आवश्यक तंत्रज्ञान महागडे करून विकसनशील देशांच्या विकासात अडथळे आणणे, हा पाश्चिमात्य देशांचा नववसाहतवादच म्हटला पाहिजे.मायक्रोसॉफ्टचे सर्वेसर्वा बिल गेटस् यांची अलीकडेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी जी चर्चा झाली त्यामध्ये त्यांनी एक प्रश्न आवर्जून विचारला, तो म्हणजे 'ग्रीन जीडीपी'बाबत भारताचे काय धोरण आहे? सध्या भारताने 'ग्रीन जीडीपी' मोजावा, अशी मागणी पश्चिमी जगाकडून होत आहे. बिल गेटस् यांच्या प्रश्नाला उत्तर देताना पंतप्रधान मोदींनी सांगितले की, तत्त्वतः हे प्रत्येक देशाने केले पाहिजे. आम्ही याबाबत दोन पद्धतीने काम करत आहोत.एक म्हणजे पर्यावरणस्नेही किंवा पर्यावरणाची किमान हानी होईल, अशा तंत्रज्ञानाचा शोध आणि विकास व्हावा यासाठी एक लाख कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात केली आहे. देशभरातील विद्यार्थ्यांना त्यासाठी प्रवृत्त करत आहोत. कोणत्याही प्रकारचा आर्थिक विकास हा पर्यावरणपूरक व्हावा, ही भूमिका आहे.'ग्रीन जीडीपी'ची संकल्पना जुनी आहे. एकविसाव्या शतकामध्ये ती प्रकर्षाने पुढे आली. याचे कारण अमेरिका आणि अन्य पाश्चिमात्य प्रगत देशांचा 'ग्रीन जीडीपी'विषयी आग्रह आहे. विशेष म्हणजे ऐतिहासिक काळापासून या देशांनी पर्यावरणाची अपरिमित हानी करून, आपापल्या देशांचा आर्थिक विकास घडवला, साधनसंपत्ती निर्माण केली. त्यामुळे हे देश 'हिस्टॉरीकल पोल्युटर्स' म्हणजेच इतिहासकाळापासून प्रदूषण करणारे देश आहेत.आज त्यांचा आर्थिक विकास कुंठितावस्थेत आहे. दुसरीकडे आशिया खंडातील भारत, चीनसारखे विकसनशील देश वेगाने विकास करत आहेत. साधनसंपत्तीची निर्मिती करत आहेत, निर्यातवाढीसाठी प्रयत्नरत आहेत. आपल्या देशाला एक्स्पोर्ट डेस्टिनेशन बनवण्यासाठी, जागतिक पुरवठा साखळीचा भाग बनवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. यासाठी 'मेक इन इंडिया', 'आत्मनिर्भर भारत' यांसारखे प्रकल्प भारत राबवत आहे.भारताचा विचार करता, येणाऱ्या २५ वर्षांसाठीचा दीर्घकालीन कृतीआराखडा बनवला आहे. त्यानुसार भारत विकसनशील देशाकडून विकसित देशाकडे वाटचाल करणार आहे. याच काळात भारतीय अर्थव्यवस्थेचा आकार सध्याच्या २.७५ ट्रिलीयन डॉलरवरून पाच ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट आहे.जगातील प्रमुख मॅन्युफॅचरिंग हब बनून निर्यातवाढीसाठी भारत प्रयत्नरत आहे. चीनने खूप आधीच हनुमान उडी घेतलेली आहे. आता भारत आत्मविश्वासाने आणि गतिमानतेने मार्गक्रमण करत आहे. अशा वेळी हे पश्चिमी देश भारताला 'ग्रीन जीडीपी'चा आग्रह धरत आहेत.ही संकल्पना वसुंधरेच्या रक्षणासाठी विकसित केलेली असली तरी सद्यस्थितीत तिसऱ्या जगातील विकसनशील देशांचा आर्थिक विकास रोखण्यासाठीचे साधन म्हणूनही त्याचा वापर केला जातो आहे. 'जीडीपी' म्हणजे ग्रॉस डोमेस्टिक प्रॉडक्शन अर्थात सकल राष्ट्रीय उत्पादन. देशातील वस्तू आणि सेवांचे एकूण उत्पादन. भारतात आर्थिक वर्षाच्या सुरुवातीपासून म्हणजेच एक एप्रिलपासून दर तीन महिन्यांनी 'जीडीपी'ची गणना होते.पुढील पाच वर्षांमध्ये पाच ट्रिलीयन डॉलरचे उद्दिष्ट गाठायचे असेल तर ८ ते ९ टक्के विकासदर ठेवावा लागेल. २००८ ते २०१८ या काळात भारताने तो ठेवलाही होता. परंतु २०२०मधील कोरोना महासाथीमुळे तो घसरला. तरीही सद्यस्थितीत भारत जगातील सर्वाधिक आर्थिक विकास दर असणारा देश असून, तो ६ टक्क्यांपेक्षा अधिक आहे. येणाऱ्या काळात त्यामध्ये दोन ते तीन टक्क्यांची वाढ गरजेची आहे. ते करताना पर्यावरणाचे रक्षणही आवश्यक आहे.जगामध्ये कोणतेही उत्पादन हे पर्यावरणाच्या हानीशिवाय होऊ शकत नाही. शेतीत वापरल्या जाणाऱ्या रासायनिक खतांमुळे आणि किटकनाशकांमुळे माती, पाण्याचे प्रदूषण होते. वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे वायू आणि ध्वनीप्रदूषण होते. या पर्यावरणाच्या हानीची किंमत वजा करून येणारी रक्कम म्हणजे 'ग्रीन जीडीपी'. थोडक्यात, 'जीडीपी'मधून पर्यावरणाची हानी वजा केल्यानंतर येणारा आकडा म्हणजे 'ग्रीन जीडीपी'.त्यामुळे पर्यावरणाची कमीत कमी हानी करून आर्थिक विकासाला प्राधान्य हे यामागचे सूत्र आहे.अर्थात, पर्यावरणाची हानी मोजायची कशी, हा कळीचा मुद्दा आहे. कोणताही देश स्वतःहून पर्यावरणाची हानी किती झाली हे सांगणार नाही. असे असूनही पश्चिमी देश सातत्याने 'ग्रीन जीडीपी' जाहीर करण्याची मागणी करत आहेत.२००६ मध्ये चीनने 'ग्रीन जीडीपी' किती आहे याची गणना केली आणि त्याची आकडेवारीही घोषित केली. त्यानंतर आजतागायत चीनने चुकूनही 'ग्रीन जीडीपी' जाहीर केलेला नाही. कारण पर्यावरणाच्या हानीची आकडेवारी जाहीर केल्यास त्या देशावर निर्बंध टाकले जाणार हे अटळ असते. आज जागतिक व्यापाराच्या विविध करारांमध्ये उत्पादनांच्या निर्मितीमध्ये पर्यावरणाची हानी होते की नाही, हा मुद्दा उपस्थित होतो.भारताने आजपर्यंत कधीही 'ग्रीन जीडीपी' मोजलेला नाही. २०१३मध्ये भारताने यासाठी आयोगाची स्थापना केली. पार्थ गुप्ता त्याचे अध्यक्ष होते. या आयोगाने २०१४–१५मध्ये 'ग्रीन अकौंट फ्रेमवर्क' नावाचा अहवाल सादर केला. त्यापलीकडे भारताने 'ग्रीन जीडीपी' गणनेसाठी काहीही केलेले नाही. याचे कारण 'ग्रीन जीडीपी'च्या माध्यमातून भारताच्या आर्थिक विकासात अडथळा आणण्याचा प्रयत्न पश्चिमी देश करत आहेत.आजवर पर्यावरणाचे शोषण करून आर्थिक विकास साधल्यानंतर त्यांना निसर्गसंवर्धनाविषयी आलेली जाग हे त्यांचेच एक प्रकारचे षडयंत्र आहे. मानवाधिकारांच्या प्रश्नाबाबत पश्चिमी देशांचा हा दुटप्पीपणा अनेकदा दिसलेला आहे. इतर देशांच्या कारभारात हस्तक्षेपाच्या संधींचा शोध घेणारे हे देश आहेत. हे करताना हे देश आपल्या देशात काय चालले आहे, आपला इतिहास काय, याविषयी कधीच आत्मचिंतन करत नाहीत.पर्यावरणाची हानी कमी करून विकास दर वाढवायचा असेल तर त्यासाठी आवश्यक आधुनिक तंत्रज्ञान कमालीचे महागडे आहे. अशा तंत्रज्ञानावर पश्चिमी देशांची पकड आणि मक्तेदारी आहे. त्यांनी हे तंत्रज्ञान गरीब विकसनशील देशांना देण्याची गरज आहे. पण त्यासाठी ते तयार नसतात. जरी तयारी दर्शवली तरी त्यासाठी प्रचंड किंमत आकारतात, जी विकसनशील देशांना परवडत नसते. थोडक्यात दोन्ही बाजूंनी आडमुठी भूमिका घेत विकसनशील देशांवर दबाव टाकत राहणे ही पश्चिमी देशांची भूमिका दिसते. भारताने आता कार्बन डायऑक्साईडचे उत्सर्जन शुन्यावर आणावे, यासाठी पश्चिमी देशांकडून सातत्याने दबाव आहे. भारताने या दिशेने प्रयत्न चालवले आहेत. तथापि, उत्पादन क्षेत्राचा विकास करताना पर्यावरणाची हानी अटळ आहे. अशा स्थितीत पर्यावरणाशी सुसंगत विकास कसा साधता येईल, हे भारतापुढचे आव्हान असेल. पर्यावरण रक्षणासाठी 'ग्रीन जीडीपी'चा आग्रह धरणे चुकीचे नाही. पण त्याचा वापर वसाहतवादी मानसिकतेतून होतो आहे.काही मूठभर देशांचा विकास व्हावा आणि अन्य देशांनी त्यांच्यावर विसंबून परावलंबी राहावे, ही यामागची भूमिका आहे.

# भाजपाची दांडगाई, शिंदेसेनेची कोंडी!

लोकसभा निवडणुकीच्या तिस–या टप्प्यात राज्यातील अकरा मतदारसंघांत निवडणूक होणार असून, त्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्यास शुक्रवारी सुरुवात होईल. या आठवड्याच्या अखेरीस पहिल्या तीन टप्प्यांत मतदान होणा–या २४ मतदारसंघांतील म्हणजेच अर्ध्या महाराष्ट्रात निवडणूक प्रक्रिया सुरू झालेली असेल. तोवर तरी महायुती व महविकास आघाडीतील जागावाटपाचा गोंधळ संपेल का? हा अवघ्या महाराष्ट्राला पडलेला प्रश्न आहे. भाजपाच्या दांडगाईमुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या पक्षाचे मंत्री, आमदार अस्वस्थ आहेत. तर दुसरीकडे शिवसेनेच्या टगेगिरीमुळे काँग्रेसमध्ये खदखद वाढते आहे. एकेका जागेसाठी मित्रपक्षांबरोबर सुरू असलेला संघर्ष बघता, निवडणुकीत विरोधकांबरोबर लढण्यासाठी यांच्याकडे वेळ व त्राण उरेल की नाही, अशी शंका यायला लागली आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बंडामुळे राज्यातील महाविकास आघाडी सरकार कोसळून महायुतीची सत्ता आली. ठरल्याप्रमाणे शिंदेंना मुख्यमंत्री केले तरी सरकारचा कंट्रोल भाजपाने स्वत:कडे ठेवला. भविष्यात प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस फोडून आणखी एक पर्याय तयार ठेवण्यात आला. त्यांचे परतीचे दोर कापल्यानंतर आता या दोघांच्याही विस्तार आणि महत्त्वाकांक्षांना कात्री लावण्याचा कार्यक्रम सुरू झाला आहे. कुठल्यातरी सर्वे क्षणाचा आधार देऊन शिवसेनेला हक्काचे मतदारसंघ नाकारण्यात आले. जे मतदारसंघ सोडले तेथील उमेदवार बदलायला लावले. मागच्या आठवड्यात भाजपाच्या दबावामुळे हिंगोलीचे विद्यमान दिसतेय. ठाणे, नाशिकचा निर्णय होईपर्यंत आपला मुलगा श्रीकांत शिंदे यांची कल्याणमधील उमेदवारी जाहीर करायची नाही, असे मुख्यमंत्र्यांनी ठरवले होते. परंतु स्वत: देवेंद्र फडणवीस यांनी त्यांची उमेदवारी जाहीर करून कुरघोडी केली आहे. नाशिक व ठाण्याची जागा अजूनही मुख्यमंत्र्यांनी पकडून ठेवली आहे. पण किती काळ ते करू शकतील, हा विषय किती ताणू शकतील? याबद्दल शंका आहे. मर्यादेपलीकडे ताणले तर लोकसभा निवडणुकीनंतर राज्यातील सरकारवर त्याचे परिणाम होतील का? याबद्दल वेगवेगळे तर्क व्यक्त होत आहेत. लोकसभा निवडणुकीत भाजपाला यश मिळाले व केंद्रात पुन्हा मोदी सरकार आले तर विधानसभा निवडणुकीत भाजपाचा दबाव आणखी वाढू शकतो. कुठल्या तरी सर्वेक्षणाचा आधार घेऊन आपली तिकिटं कापली जाऊ शकतात, अशी भीती आमदारांमध्ये दिसायला लागली आहे. त्यामुळे काही आमदार लोकसभेत जनमताचा काय कौल येतो हे बघून पुढची दिशा ठरवण्याची शक्यता नाकारता येत नाही. एकीकडे हक्काच्या जागा हातातून जात असल्याने शिंदेंच्या शिवसेनेत अस्वस्थता असताना अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये काही वेगळी स्थिती आहे असे नाही. अजित पवार यांच्यासोबत सुनील तटकरे हे राष्ट्रवादीचे एकमेव खासदार आहेत. पण किमान नऊ जागा मिळाव्यात यासाठी ते आग्रही होते. किती जागा मिळणार हे अजून स्पष्ट झाले नसले तरी ही अपेक्षा पूर्ण होईल असे दिसत नाही. परभणी व धाराशिव या दोन जागा त्यांना केवळ कागदोपत्री सुटल्या आहेत. परभणीची जागा घेऊन आपले उमेदवार जाहीर केले आहेत. या दोन्ही जागांसाठी काँग्रेस खूप आग्रही होती. सांगली हा गेल्या अनेक वर्षांपासून काँग्रेसचा बालेकिल्ला आहे. काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतरही काँग्रेसने हा किल्ला राखला होता. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, स्व. आर आर. पाटील यांच्यासारखे दिग्गज नेते असूनही येथे काँग्रेसचेच वर्चस्व राहिले होते. परंतु गेल्या दहा वर्षांत काँग्रेस, राष्ट्रवादीमधील नेत्यांना गळाला लावून भाजपाने इथे आपले बस्तान बसवले आहे. संजयकाका पाटील दोन वेळा खासदार म्हणून निवडून आले आहेत. मागच्यावेळी वंचित बहुजन आघाडीकडून लढलेल्या गोपीचंद पडळकर यांनी मोठ्या प्रमाणात मते घेतल्याने काँग्रेसचा पराभव झाला.आता पडळकर भाजपात आहेत. विशाल पाटील यांनी मागच्या पराभवाची परतफेड करण्यासाठी जबरदस्त तयारी केली होती. पण शिवसेनेने डबल हिंद केसरी चंद्रहार पाटील यांना पक्षात घेऊन त्यांची परस्पर उमेदवारी जाहीर करून टाकली. इकडे भिवंडीत राष्ट्रवादीच्या पवार गटाने तेच केले. सुरेश ऊर्फ बाळ्यामामा म्हात्रे यांना उमेदवारी देऊन, काँग्रेसचा 'मामा' केला. सांगली आणि भिवंडीतील स्थानिक काँग्रेस नेत्यांनी आक्रमक भूमिका घेऊन बंडाची भाषा सुरू केली आहे. यावर सामोपचाराने मार्ग काढण्याऐवजी सांगलीत आमची कोंडी केली तर पूर्ण महाराष्ट्रात काँग्रेसची कोंडी करण्याचा इशारा खा. संजय राऊत यांनी दिला आहे. त्यामुळे वातावरण आणखी गढुळले आहे. सांगलीची जागा काँग्रेसकडे राहावी यासाठी माजी मंत्री विश्वजीत कदम



खासदार हेमंत पाटील यांना जाहीर झालेली उमेदवारी काढून घेण्यात आली. यवतमाळ–वाशिम मतदारसंघातून पाच वेळा निवडून आलेल्या भावना गवळी यांचे तिकिट कापण्यात आले. पूर्वी शिवसेनेकडे असलेले अमरावती, शिरूर, धाराशिव, परभणी हे मतदारसंघ काढून घेण्यात आले. नाशिक, संभाजीनगर, रत्नागिरी–सिंधुदुर्गबरोबरच मुख्यमंत्र्यांच्या ठाणे शहरातील लोकसभा मतदारसंघावर भाजपाने दावा सांगितला आहे. यामुळे शिंदेसेनेत प्रचंड अस्वस्थता असून, शनिवारी मुख्यमंत्र्यांनी बोलावलेल्या बैठकीत ही खदखद बाहेर आली. आम्ही धाडस करून उठाव केला म्हणून भाजपाला सत्ता मिळाली आहे. त्यावेळी दिलेला शब्द जर भाजपकडून पाळला जात नसेल तर योग्य नाही. भाजपाने कितीही दबाव आणला तरी कोणत्याही स्थितीत ठाणे, नाशिक, रत्नागिरी–सिंधुदुर्ग, संभाजीनगर अजिबात सोडू नये, अशी मागणी या बैठकीत करण्यात आली. युती केल्यानंतर काही तडजोडी कराव्या लागतात, आता राष्ट्रवादी काँग्रेसही आपल्याबरोबर आली आहे. त्यामुळे काही निर्णय घ्यावे लागले असले तरी कोणावर अन्याय होणार नाही, अशी ग्वाही देऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंत्री, आमदारांची समजूत काढली. पण ते स्वत:ही भाजपावर नाराज असल्याचे स्पष्ट त्यांच्या नावावर खतवून राष्ट्रीय समाज पक्षाच्या महादेव जानकर यांना देण्यात आली. तर धाराशिवला त्यांना जागेबरोबर भाजपाने देऊ केलेला उमेदवारही स्वीकारावा लागला आहे. नाशिकची जागा त्यांना खरंच हवी आहे का? की भाजपालाच छगन भुजबळ यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवून काही सोशल इंजिनीअरिंग करायचं आहे, हे कळायला मार्ग नाही. त्यामुळे स्वाभाविकच अजितदादांसोबत आलेल्या आमदारांमध्ये चुळबुळ वाढली आहे. भुजबळांना महायुतीचे उमेदवार म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरवले तर मराठा आरक्षण आंदोलक आक्रमक पवित्रा घेण्याची शक्यता आहे. त्याचे पडसाद राज्यभर उमटतील. भाजपाला हेच ध्रुवीकरण हवे आहे का? याबद्दलही राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहेत. शिंदे किंवा अजित पवार आज भाजपाच्या आग्रहाला थेट विरोध करण्याची शक्यता नाही. पण परस्पर विश्वासाला मात्र तडा गेला आहे व लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर त्याचे 'आफ्टर शॉक' आले तर आश्चर्य नको. मात्र सध्यातरी शिंदे–पवारांची स्थिती 'सांगताही येत नाही, आणि सहनही होत नाही' अशी झाली आहे. शिवसेनेच्या दांडगाईमुळे काँग्रेसमध्ये पेच ! महाविकास आघाडीतील जागावाटपाची चर्चा अपूर्ण असतानाच शिवसेनेने सांगली व राष्ट्रवादीने भिवंडी हे मतदारसंघ स्वत:कडे यांची धावाधाव सुरू आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचीही त्यांनी दिल्लीत जाऊन भेट घेतली. पण त्याचा काही उपयोग होईल असे दिसत नाही.सांगली आणि भिवंडी या दोन्ही ठिकाणी काँग्रेसलाच माघार घ्यावी लागेल असे दिसतेय. आघाडीचा धर्म म्हणून आपल्याच पक्षातील बंडखोरांवर कारवाई करावी लागेल. या दोन जागांचा निकाल काहीही लागला तरी या कारवाईमुळे काँग्रेसच कमकुवत होईल व विधानसभा निवडणुकीत त्याचे परिणाम दिसतील. दोन फुटलेल्या पक्षांनी व्यवस्थित सोंगट्या हलवून लोकसभेच्या अधिक जागा पदरात पाडून घेतल्या. त्यांच्या तिप्पट आमदार असलेल्या काँग्रेसच्या राज्यातील नेत्यांना ही किमया जमली नाही. लोकसभेतल्या यशावर विधानसभेच्या जागावाटपाचे सूत्र ठरणार असल्याने त्यावेळीही आणखी अडचण होण्याची शक्यता आहे. त्यामुळेच काँग्रेसमधील खदखद वाढली आहे. हेच निमित्त करून संजय निरुपम यांनी सत्तेच्या सावलीत जाण्याचा निर्णय घेतला आहे. सांगली, भिवंडीतील काही लोकांनी तोच रस्ता धरला तर आश्चर्य वाटायला नको.

# तोल मोल के बोल!

काही माणसं मोठी मजेशीर असतात. त्यांची तोंडाची बडबड सारखी सुरू असते. ते जिभेवरचा तीळही भिजू देत नाहीत. त्यात तोतरेपणा असेल तर मग विचारूच नका! भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या ही व्यक्ती त्यापैकीच एक. त्यांची बडबड सुरू झाली आणि त्यात तोतरेपणाची भर पडली की त्यांना बोलण्यासाठी किती कष्ट घ्यावे लागत आहेत असेच वाटते. या व्यक्तीने काही दिवस राजकारण चांगलेच गाजवले आहे. त्याने आपल्या कारनाम्यांमुळे ब–याच व्यक्तींना हादरवून सोडले आहे. भ्रष्टाचार खोदून काढण्यात त्यांचा हातखंडा आहे. सोमय्यांनी तोंड उघडले की एखादे गुपित बाहेर येणारच. गौप्यस्फोट करण्यात ते माहिर आहेत. वास्तविक पाहता भ्रष्टाचाराची प्रकरणे शोधून काढण्यासाठी ईडी, सीबीआय, आयकर विभाग यासारख्या तपासयंत्रणा, संस्था अस्तित्वात आहेत.परंतु सोमय्या म्हणजे चालता–बोलता इतिहास नव्हे वर्तमानच! ते कधी कोणता गौप्यस्फोट करतील आणि एखाद्याला गोत्यात आणतील ते सांगता येत नाही. उद्धव ठाकरेंचा भ्रष्टाचार बाहेर काढण्याचा आदेश फडणवीसांनीच मला दिला असा गौप्यस्फोट किरीट सोमय्या यांनी नुकताच केला आहे. एका खासगी वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी हे गुपित फोडले. भाजपने उद्धव ठाकरे यांच्याशी युती तोडली आणि अनेक पक्ष फोडून महाराष्ट्राचे राजकारण ढवळून काढल्याने अनेकांच्या मनात भाजपबद्दल रोष असतानाच भ्रष्टाचाराची प्रकरणे खोदून काढण्यात आघाडीवर असलेले किरीट सोमय्या यांनी हा स्फोट केला आहे. देवेंद्र फडणवीस यांनीच मला उद्धव ठाकरेंशी संबंधित भ्रष्टाचाराची प्रकरणे शोधून काढण्याचा आदेश दिला होता. सुरुवातीस मी तसे करण्यास नकार दिला मात्र हा पक्षाचा आदेश आहे असे त्यांनी मला बजावले आणि मला कामाला लावले असे सोमय्या म्हणाले. मुंबई महापालिकेतील उबाठा सेनेचे घोटाळे बाहेर काढण्याचा आदेश फडणवीस यांनी दिला होता. यावर मी पालिकेतील भ्रष्टाचार बाहेर काढतो मात्र, ठाकरे कुटुंबाला यापासून आपण दूर ठेवूया असे फडणवीसांना म्हणालो होतो परंतु पक्षाचा आदेश आहे असे ते म्हणाल्याने मला तसे करावे लागले असेही सोमय्यांनी म्हटले आहे. आपण भाजपचा शिस्तीचा कार्यकर्ता असून पक्षाने जो आदेश दिला तो पाळत गेलो. हसन मुश्रीफ यांचा भ्रष्टाचार असो किंवा 'मातोश्री' संबंधित भ्रष्टाचाराची प्रकरणे असोत आपण एक–एक प्रकरण काढत राहिलो. राज्यात मविआचे सरकार असताना सोमय्या यांनी सत्ताधारी नेत्यांची भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे उघड केली होती आणि त्यांच्यामागे चौकशीचा ससेमिरा लावला होता. राज्यात महायुतीचे सरकार आल्यापासून सोमय्या प्रसिद्धीपासून थोडे दूर राहिले आहेत. मात्र, आता त्यांनी महायुती सरकारच्या कारभारावरही बोट ठेवले आहे. ते म्हणाले, गत दीड–दोन वर्षात या सरकारनेही गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला



आहे. कारण व्यक्ती तर त्याच आहेत म्हणजे आघाडीतील अनेक नेते आज महायुतीत आहेत. तिकडचे घोटाळेबाज लोकच तुम्ही घेतले आहेत! ठाकरे सरकारच्या काळात ३३ महिने जे काही चालू होतं तेच पुढे चालू राहिलं असतं तर सोमय्या हिरो झाला असता परंतु राज्याची वाट लागली असती. राज्याची वाट लागू नये म्हणून मी काही तडजोडी केल्या असेही सोमय्या म्हणाले. 'मातोश्री'चा भ्रष्टाचार बाहेर काढण्याचे आदेश दिल्लीहून आले होते तसेच फडणवीस यांनीही सांगितले होते अशी माहिती सोमय्या यांनी दिली. भाजपच्या निवडणूक प्रचाराचा जोर अन्य मुद्यांसोबत भ्रष्टाचाराच्या मुद्यावरही आहे. त्यामुळे बिहारमध्ये निवडणूक प्रचाराच्या सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी भ्रष्टाचाराच्या मुद्यावरून विरोधकांवर विशेषत: लालुप्रसाद यादव यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. आम्ही 'भ्रष्टाचार हटाओ' असे म्हणतो तर विरोधक 'मोदी हटाव' म्हणत आहेत. मोदी सरकारच्या काळात भ्रष्टाचार न झाल्यामुळे सगळा पैसा विकासाच्या कामासाठी वापरला गेला. आज देशात जी मोठ्या प्रमाणात विकासकामे झालेली दिसतात, त्याचे मूळ भ्रष्टाचारविरोधी आंदोलनात आहे हे खरे असले तरी भाजपने जे 'इन कमिंग' सुरू केले आहे त्यात अन्य पक्षातील भ्रष्टाचारी नेते सामील होत आहेत त्याचे काय? भाजपने गत दशकात अत्यंत खालची पातळी गाठत खुनशी व कपटी राजकारण करून विरोधकांना संपवण्याचे काम केले आहे. महाराष्ट्रात सरकारी यंत्रणेला हाताशी धरून काँग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांना ब्लॅकमेल केले आहे यात शंका नाही. भाजपच्या या कपटी राजकारणाविरुद्ध काँग्रेसने सातत्याने आवाज उठवला. हेच सत्य आता किरीट सोमय्यांच्या मुखातून बाहेर पडले आहे. विरोधकांना भ्रष्ट ठरवून बदनाम करण्याचे षडयंत्र रचण्यामागे उपमुख्यमंत्री फडणवीस यांचा हात होता हे सोमय्या यांनीच उघड केल्याने कपटी राजकारणाचा बुरखा फाडला गेला आहे. या निमित्ताने फडणवीस यांचा खरा चेहरा जनतेसमोर आला आहे. भ्रष्टाचाराच्या नावाखाली महाराष्ट्रात पद्धतशीरपणे एक रॅकेट चालवण्यात आले. या रॅकेटचे खलनायक फडणवीस असल्याचे आता लपून राहिलेले नाही. महाराष्ट्राला एक मोठी राजकीय परंपरा लाभली आहे. या परंपरेला फडणवीस यांनी काळिमा फासला आहे. सोमय्या यांनीच हे सारे उघड केल्याने भाजपची भ्रष्टाचारविरोधातील लढाई ही केवळ विरोधकांना संपवण्यासाठीच होती हे स्पष्ट झाले आहे. भ्रष्टाचा–यांना सोडायचे नाही पण त्यांना ब्लॅकमेल करून भाजपात सन्मानाने प्रवेश द्यायचा हाच त्यांचा राजकीय अजेंडा आहे. सोमय्याचा कारनामा पाहून भाजपवाले म्हणत असतील तोल मोल के बोल बाबा!

# जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालयांनी चांगली सेवा आणि गुणवत्तेचा पॅटर्न निर्माण करावा

## वंदना काटकर यांचे आवाहन

लातूर :- ग्रंथालयांना शासकीय अनुदान देण्याची प्रक्रिया होत असते,तथापि केवळ शासनाच्या अनुदानावर अवलंबून न राहता,विविध उपक्रम राबवून,ई सेवा केंद्राच्या सेवा देत स्वतःचे उत्पन्न वाढवावे असे सांगून जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालयांनी वाचकांना दर्जेदार सेवा देत गुणवत्तेचाही पॅटर्न निर्माण करावा,असे आवाहन जिल्हा शासकीय ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर यांनी येथे केले. लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाच्यावतीने चालविण्यात येणार्या शासनमान्य ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्ग २०२४ चा शुभारंभ आणि नूतन जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर यांचा स्वागत सत्कार समारंभ सोमवार,दि.८एप्रिल २०२४ रोजी संघाच्या हुतात्मा स्मारक कार्यालयात आयोजित संयुक्त समारंभात उद्घाटक म्हणून त्या बोलत होत्या.समारंभाच्या अध्यक्षपदी जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रभाकर कापसे तर प्रमुख मराठवाडा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष राम मेकले,जिल्हा ग्रंथालय निरीक्षक हरिश्चंद्र डेंगळे,ज्येष्ठ संचालक हावगीराव बेरकीळे हे उपस्थित होते. ग्रंथालयाच्या माध्यमातून वाचकांना सेवा देत देत शासनाच्या विविध योजनांची माहिती द्यावी,दैनंदिन घडामोडीची माहिती द्यावी,वाचनालयाचे उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करावेत,ग्रामीण स्पर्धा परीक्षार्थींना साहित्य उपलब्ध करुन द्यावे,बालवाचक वाढवावे,ग्रंथालयांना आरआर फ़ाउंडेशनच्या माध्यमातून संगणक उपलब्ध करुन देण्याचा आपला प्रयत्न राहील अशी ग्वाही देवून ग्रंथपालन वर्गाचे उद्घाटन झाल्याचे जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर यांनी जाहीर केले. अध्यक्षीय समारोपात प्रभाकर कापसे यांनी ग्रंथपालन वर्ग आणि जिल्ह्याच्या ग्रंथालय चळवळीची माहिती दिली.ग्रंथमित्र राम मेकले,ग्रंथपालन वर्गाचे मुख्याध्यापक अमित म्हेत्रे,शिक्षक प्राचार्य युवराज अंधोरीकर,शादुल शेख यांनी मनोगत व्यक्त केले.हावगीराव बेरकीले यांनी प्रास्ताविक केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा ग्रंथालय संघाचे संचालक संतोष करमले यांनी केले. संचालक अजित पाटील यांनी आभार मानले. प्रारंभी ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले.त्यानंतर नूतन जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर तसेच प्रमुख पाहुण्यांचा जिल्हा ग्रंथालय संघ,ग्रंथपालन वर्गाचे शिक्षक,सर्व तालुक्याचे प्रतिनिधी, महिला आणि विविध ग्रंथालयांच्यावतीने शाल,पुष्पहार,ग्रंथ भेट देवून स्वागत केले.वर्गशिक्षक डॉ.धनंजय घटकार,वैशाली दुरुगकर,शारदा कनामे,युवराज अंधोरीकर यांचाही सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमासाठी सार्वजनिक ग्रंथालय संघाचे सूर्यकांत शिरसे,काशिनाथ बोडके,राम मोतीपवळे,गुप्तलिंग स्वामी,किरण बाबळसूरे, बाळकृष्ण होळीकर,नंदकुमार घोगरे,गिरीधर जंगाले,सुशील मेकले,विठ्ठल कटके,सूर्यकांत जाधव आदिंनी सहकार्य केले.या कार्यक्रमाला ग्रंथालय कर्मचारी,ग्रंथालय चालक,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते,राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता ाली.

# तुरीच्या दरात मोठी वाढ; १२ हजार रुपये भाव !



नागपूर: सरकारी यंत्रणा लोकसभा निवडणुकीत गुंतल्याचा फायदा व्यापारी घेत आहेत. केवळ सहा दिवसात तुरीचे दर प्रति क्विंटल दोन हजारांनी वाढून दर्जानुसार ११ ते १२ हजारांवर पोहोचले. त्यानुसार तूर डाळीचे दर १५० ते १७५ रुपयांवर गेले आहेत.
दरवाढीमुळे सर्वसामान्यांच्या ताटातून वरण गायब झाले आहे.
कळमना धान्य बाजार अडतिया असोसिएशनचे पदाधिकारी कमलाकर घाटोळे म्हणाले, कळमन्यात गेल्या आठवड्यात तुरीचे दर अचानक वाढायला लागले. १० हजारांचे दर (प्रति क्विंटल) १२ हजारांवर पोहोचले. दरदिवशी ३ ते ४ हजार पोत्यांची आवक होत आहे. शिवाय चण्याचे दर प्रति क्विंटल ३०० रुपयांनी वाढून ५,५०० ते ५,८५० रुपयांवर पोहोचले. ४ ते ५ हजार चण्याच्या पोत्याची आवक आहे. सोयाबीनचे दरही प्रति क्विंटल ३०० ते ४०० रुपयांनी वाढून ४ हजार ते ४,४५० रुपयांवर गेले आहेत. दररोज ८०० ते एक हजार पोते विक्रीसाठी येत आहेत.
कळमना धान्य बाजारातील घाऊक व्यापारी रमेश उमाटे म्हणाले, तूर आणि चण्याचे दर वाढल्याने तूर डाळ आणि चणा डाळीच्या दरात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. आठवड्यात तूर डाळीचे दर दर्जानुसार प्रति किलो १५० ते १७५ रुपये तर चणा डाळी ७२ ते ७७ रुपयांदरम्यान विकली जात आहे. पुढे भाव किती वाढतील, हे आता सांगणे कठीण आहे.

# महात्मा ज्योतिराव फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती निमित्त प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन





लातूर:- महात्मा ज्योतिराव फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती निमित्त १० एप्रिल ते १४ एप्रिल २०२४ दरम्यान विविध वैचारिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. १० एप्रिल रोजी सायं.६ वा. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे सत्यशोधक हा महात्मा फुलेंचा जिवनपट व त्यांचा संघर्ष उलघडा करणारा चित्रपट सर्वांसाठी मोफत दाखविण्यात येणार आहे.११ एप्रिल रोजी सकाळी ८ वा.महात्मा फुले यांना अभिवादन करण्यात येणार असून सायंकाळी ५ वा.छ. शिवाजी महाराज चौक ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्या पर्यंत प्रबोधनात्मक पदयात्रा काढण्यात येणार आहे.तर १२ एप्रिल रोजी महात्मा ज्योतिराव फुले समजून घेताना या विषयावर प्रा.डॉ.निशिकांत वारभुवन यांचे तर १३ एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे बौद्धिक चरित्र एक आकलन या विषयावर प्रा.डॉ.विश्वंभर गायकवाड यांचे भालचंद्र ब्लॅड बँक सभागृहात आयोजित करण्यात आले असून १४ एप्रिल रोजी सकाळी ९ वा.भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे. तरी सर्व फुले शाहू आंबेडकर विचारांच्या आणि सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष श्रीकांत मुद्दे,उमेश कांबळे, प्रसाद पवार,राम बुरबुरे, सचिन औरंगे, रामराजे आत्राम,डी.उमाकांत, भारत काळे,प्रा. अर्जुन जाधव, बालाजी गाडेकर,मकबुल शेख, बाळासाहेब फासे,प्रा. डॉ. मारुती गायकवाड, तुळशीराम गोंदकर, कवी दिलीप गायकवाड, ड.गोपाळ बुरबुरे,प्रा.दत्तत्रय सुरवसे,प्रा. पद्माकर वाघमारे, आनंदभाई वैरागे, संतोष माळी,प्रा.बलभीम सातपुते, रणजित आचार्य,प्रज्वल उबाळे,प्रा.कुमार जाधव,गौतम मुळे, नागनाथ पोळकर,पांडुरंग माळी,अक्षय हालकी,डी.के माळी,जी.ए.गायकवाड,नरसिंग घोडके,यु.डी.गायकवाड,विकास कांबळे,प्रा. सुभाष भिंगे,प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे, डॉ अशोक नारनवरे,श्रीधर शेवाळे, सुभाष सुर्यवंशी,प्रा.युवराज वाघमारे,मोहन सेलूकर, राजकुमार होळीकर, विश्वंभर भोसले, राजकुमार नामवाड, शिरिष दिवेकर,एकनाथ पलमटे, मधुकर दुबे,बरकत काजी, पांडुरंग आडसुळे, बाबुराव भाले,ड. किरण कांबळे,ड.संतोष मस्के,प्रा.शिवाजी जवळगेकर,दशरथ मस्के, राजेंद्र कांबळे,जेटी शेख,जी.जी कांबळे,दिपक साठे, सुभाष मस्के,खंडेराव भोजराज, घोटमुकले सर, खंडोबा बनसोडे बालाजी साबळे माधव बावगे, रुकसाना मुल्ला,राहुल लोंढे, प्रा.शिवाजी शिंदे,प्रा.सुधिर अनवले, विजयकुमार चिखलीकर,डॉ.असद खान,ड.आरवाय शेख,प्रा.हर्षवर्धन कोल्हापूरे सर व समस्त महात्मा जोतिराव फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक बहुजन बुद्धीवादी जयंती उत्सव समिती व क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात येत आहे.

# स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे गुरूकुल स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश



यशाची परंपरा कायम : प्राचार्य शिंदे व मुख्याध्यापक सूर्यवंशी यांच्याहस्ते गुणवंताचा सत्कार लातूर दि.०८-०४-२०२४ जेएसपीएम संचालित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालय एमआयडीसी लातूर येथील गुरूकुल प्रज्ञाशोध परीक्षा २०२३-२४ साठी बसविण्यात आलेल्या एकूण २३४ विद्यार्थ्यापैकी ४३ विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत आले तर २८ विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत आले असून एकूण ९९ विद्यार्थ्यांनी गुरुकुल स्पर्धा परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केलेले आहे.त्यांच्या यशाबद्दल स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य गोविंद शिंदे व स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी सूर्यवंशी यांच्याहस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना गुलाबाचे फुल देऊन सन्मानीत करण्यात आले. त्यांच्या या यशाबद्दल जेएसपीएम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर साहेब, संस्थेच्या सचिव सौ.प्रतिभाताई शिवाजीराव पाटील कव्हेकर, संस्थेचे उपाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर, कार्यकारी संचालक रंजितसिंह पाटील कव्हेकर, समन्वयक संचालक निळकंठराव पवार, समन्वयक विनोद जाधव, समन्वयक बापूसाहेब गोरे, प्राचार्य मारुती सूर्यवंशी, उपमुख्याध्यापक तुकाराम येलाले, ॲकॅडमीक कोऑर्डीनेटर वर्षा वेदे, स्पर्धा परीक्षा विभाग प्रमुख वर्षा लोंढे, आश्विनी कांबळे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# लातूरकरांसाठी खुशखबर ! आता चार दिवसाआड नळाला येणार पाणी



लातूर/प्रतिनिधी:एप्रिल महिन्याच्या सुरुवातीलाच पाणीटंचाईच्या झळा बसत असताना लातूर महानगरपालिकेने शहरातील नागरिकांना खुशखबर देण्याचा निर्णय घेतला आहे.पाण्याची वाढती गरज आणि शहरात जाणवणारी टंचाई लक्षात घेता आता चार दिवसाआड म्हणजेच पाचव्या दिवशी नळाला पाणी सोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

शहरातील नागरिकांना धनेगाव येथील मांजरा प्रकल्पातून पाण्याचा पुरवठा केला जातो.यावर्षी पर्जन्यमान कमी झाल्यामुळे प्रकल्पात पुरेसा पाणीसाठा झालेला नाही. तरीही उपलब्ध पाण्याचा योग्य वापर करून नागरिकांना दर पाचव्या दिवशी पाणी देण्यात येणार आहे.

लातूर शहराला प्रकल्पातील पाण्यासोबतच विंधन विहिरीवरूनही मोठ्या प्रमाणात पाणी पुरवले जाते.परंतु यावर्षी पाणी पातळी खालावलेली असल्यामुळे विंधन विहिरी बंद पडत आहेत.परिणामी शहराच्या काही भागातील नागरिकांना पाणीटंचाई जाणवत आहे.ती दूर करण्यासाठी मनपाने चार दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेतला असून गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर याची सुरुवात केली जाणार आहे.

मांजरा प्रकल्पात यावर्षी पाणी कमी आहे.तरीही नागरिकांना पाणीटंचाईची झळ बसू नये याची काळजी मनपा घेत आहे. शहरातील नागरिकांनी उपलब्ध पाणी जपून वापरावे.पाण्याचा अपव्य करू नये.नळांना तोट्या बसवाव्या.गाड्या धुणे, पाणी गटारीत सोडणे असे प्रकार करू नयेत.पाणी जपून वापरावे,असे आवाहन मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे व उपायुक्त शुभम क्यातमवार यांनी केले आहे.

## मातंग समाजाच्या बैठकीत वंचीत बहुजन आघाडीला मतदान करण्याचा निर्णय


लातूर : लोकसभा मतदारसंघाचे वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार श्री नरसींग उदगीरकर यांना संबध मातंग समाज मतदान करणार असल्याचा निर्णय पत्रकार भवन लातूर येथील बैठकीत घेण्यात आला. यावेळी अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते श्री वामनराव हजारे हे होते.तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून माजी समाजकल्याण सभापती कोंडीबा गायकवाड व युवानेते योगेश उदगीर होते. वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार श्री नरसींग उदगीरकर यांना राष्ट्रीय अध्यक्ष मा.प्रकाशजी आंबेडकर यांनी उमेदवारी देवून बहुजन मागास वर्गाला न्याय दिला आहे.

# विश्वशांती बुद्ध विहार सेलू येथे समता सैनिक दलाचे प्रशिक्षण शिबिर संपन्न



लातूर :- भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा लातूर च्या वतीने लातूर तालुक्यातील सेलू (बु) येथील विश्वशांती बुद्ध विहार विहारांमध्ये समता सैनिकाची एक दिवशी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सुरुवातीला तथागत सम्यक संबुद्ध व बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्प, धुप व दिपाने अभिवादन करण्यात आले. या प्रशिक्षण शिबिराच्या अध्यक्षस्थानी तालुकाध्यक्ष दत्तात्रय भोसले उद्घाटक म्हणून जिल्हाध्यक्ष एम. एम. बलांडे तर प्रमुख पाहुणे म्हणून संरक्षण विभाग जिल्हा उपाध्यक्ष मेजर जनरल राजाराम साबळे, संरक्षण विभाग महिला जिल्हा उपाध्यक्ष केंद्रीय शिक्षिका मंगलताई सुरवसे, जिल्हा उपाध्यक्ष हिराचंद गायकवाड, या शिबिरामध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी समता सैनिक दलाची निर्मिती का केली व पूर्वज आणि शौर्यगाथा याची माहिती देण्यात आली. लाटी काटी सह ड्रिल, उंची प्रमाणे लाईन, संविधानिक अधिकार, आयपीसी कायदा व ट्रॉसिटी क्ट, प्रथम उपचार अशा विविध विषयावर मार्गदर्शन करण्यात आले सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत हे शिबिर संपन्न झाले या शिबिराला प्रशिक्षक म्हणून डिव्हिजन ऑफिसर विकास दंतराव, डिव्हिजन ऑफिसर विलास आल्टे, जिल्हा सचिव अभिमन्यू लामतुरे या शिबिरासाठी लातूर तालुका उपाध्यक्ष पवन कांबळे शेलुकर यांच्या पुढाकारातून शिबिर संपन्न झाले या शिबिरासाठी सेलू, धनेगाव,भाडगाव, हालकी ,येथील यूवक उपस्थीत होते शिबिर यशस्वी करण्यासाठी रवी कांबळे आदिनाथ सूर्यवंशी, देवराव जोगदंडे, लक्ष्मण कांबळे , प्रेसेंजित जोगदंड, नाना कांबळे, संतोष कांबळे,भैयासाहेब कांबळे,तसेच सेलू येथील उद्धव गायकवाड,उद्धव,कांबळे,बालाजी कांबळे,महादेव कांबळे,विश्वनाथ कांबळे,बब्रूवान कांबळे,विश्वभर कांबळे ,राजाभाऊ गायकवाड,जयश्रि कांबळे, लता कांबळे,संगीता कांबळे,आश्विनी कांबळे, दिव्या कांबळे, उपासक उपासिका यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे आभार संयोजक तालुका उपाध्यक्ष पवन कांबळे सेलूकर यांनी मांडले व कार्यक्रमाची सांगता सरणतय या धम्मपालन गाथेने करण्यात आली

# संभाजी महाविद्यालयात एक दिवसीय राष्ट्रीय ई-सेमिनार संपन्न



मुरुड/महेंद्र आल्टे : येथील संभाजी महाविद्यालयात स्वा.रा.ती.म. विद्यापीठ नांदेड व ग्लोबल फाउंडेशन इंडिया सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील 'बौद्धिक संपदा हक्क' यावर दिनांक ०६ एप्रिल २०२४ रोजी ई - सेमिनार यशस्वीरित्या संपन्न झाला. सदरील कार्यक्रमाचे आयोजन स्वा.रा.ती.म.विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. मनोहर चासकर, स.जा.शि संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. बी. एस. (दादा) पटाडे, सचिव मा. श्री. विजयजी पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार करण्यात आले होते. सदरील चर्चासत्र तीन सत्रामध्ये घेण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या सुरुवातीस संभाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक काळम यांनी प्रास्ताविक व स्वागतपर विचार मांडले. पहिल्या सत्रात प्रमुख बीजभाषक म्हणून लिंकन युनिव्हर्सिटी, मलेशिया येथील पोस्ट डॉक्टरल फेलो प्रोफेसर डॉ. अनुराग श्रीवास्तव हे लाभले होते. पाहुण्यांचा परिचय भूगोल विभागाचे प्रोफेसर व चर्चासत्र आयोजक सचिव डॉ. गणेश जाधव यांनी करून दिला. डॉ. अनुराग श्रीवास्तव यांनी आपल्या बीज भाषणात बौद्धिक संपदा हक्क याविषयाचे महत्त्व, त्याचे प्रकार, पेटेंट, कॉपीराइट आदी विषयावर आपले विचार व्यक्त केले. सदरील सत्रात कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉमर्स विद्याशाखेचे अधिष्ठाता सिनियर प्रोफेसर डॉ. डी.एम.खंदारे होते. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात साधन व्यक्ती म्हणून श्री श्री युनिव्हर्सिटी, कटक ओडिशा येथील डॉ. संदीप राऊत तसेच सिंहगड कॉलेज ऑफ इंजनिअरिंग पंढरपूर येथील डॉ. स्वानंद कुलकर्णी हे उपस्थित होते. तर सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. नितीन देशमुख, प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे उपस्थित होते. डॉ. संदीप राऊत यांनी आय. पी.आर क्रुसियल रोल इन आग्रिकल्चर अँड अल्लायीड सेक्टर्स या विषयावर आपले विचार मांडले. तर डॉ. स्वानंद कुलकर्णी यांनी इंट्रॉडक्शन टू पेटंट फिलिंग अँड कम्पोनेंट्स ऑफ पेटंट या विषयावर आपले विचार मांडले. कार्यक्रमाच्या तिसऱ्या सत्रात देशभरातील संशोधक विद्यार्थ्यांद्वारे आय.पी.आर या विषयावरील ६ संशोधन लेखांचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी अध्यक्षस्थानी डॉ. प्रशांत गवळी, डॉ. एम. ए. पाटील, डॉ. निरंजन गिरी, डॉ. अमोल शिंदे, डॉ. पी.बी. आचोले आदी होते. कार्यक्रमासाठी राष्ट्रीय स्तरावरून जवळपास १४६ जणांनी आपला सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आय. क्यू. ए .सी. समन्वयक प्रा.एम. बी. गायकवाड यांनी केले तर आभार चर्चासत्र संयोजक डॉ. मीना कदम यांनी मानले. सदरील कार्यक्रमाचे ऑनलाईन वेबकास्टिंग ग्लोबल फाऊंडेशन इंडियाच्या संचालिका प्रा .उमा काळे, प्रा. डॉ. संतोष माने व टीम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ई- चर्चासत्र आयोजन समिती, सर्व आय. क्यू. ए. सी. सदस्य, तसेच सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आदींनी प्रयत्न केले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE